महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४६ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१५२४ : पोर्तुगीज खलाशी व भारताचा शोध लावणारा दर्यावर्दी वास्को–द–गामा यांचा मृत्यू झाला.
१८९९ : साने गुरुजी यांचा जन्मदिन.
१८१८ : शक्तीच्या अविनाशित्वाचा शोध लावणारा संशोधक जेम्स प्रिस्कॉट ज्यूल यांचा जन्म झाला.

सेन्सेक्स ८५,५२४.८४ –४२.६३ (०.०५०%)
डॉलर ₹ ८९.६०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २१ | ११ |
| मुंबई | ३४ | १८ |
| नागपूर | २८ | ११ |
| पुणे | ३० | १० |

**सुविचार**

यशस्वी होण्यासाठी आत्मशिस्त आणि नियमितता महत्त्वाची आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०२ संध्या-५:५३

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,४७५/- २,२३,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र

**पुणे ।** ‘आगामी महापालिका निवडणूकएकत्र लढविण्यासंदर्भात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून अद्याप कोणताही अधिकृत प्रस्ताव आलेला नाही. स्थानिक पातळीवर त्यासंदर्भातील चर्चा सुरू आहे. मात्र, महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) यांना बरोबर घेत निवडणुकीला सामोरे जाण्याचा प्रयत्न आहे. त्यासंदर्भातील अंतिम निर्णय शरद पवार घेतील,’ असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी येथे बुधवारी स्पष्ट केले.

### राष्ट्रवादीचा जामखेडमध्ये आक्रोश मोर्चा

**कर्जत ।** अतिवृष्टीमुळे पिकांची झालेली हानी, पीक विम्याचा रखडलेला प्रश्न, शेतमालाला मिळणारा अपुरा दर यामुळे बळीराजा गंभीर संकटात सापडला आहे. मात्र, सत्ताधारी शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ निवडणुकीच्या राजकारणात मश्गूल असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) जामखेड येथे शेतकऱ्यांचा ‘आक्रोश मोर्चा’ काढला.

### चांदी २० हजार रूपयांनी महागली

**जळगाव ।** शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने दरवाढ होत असताना, बुधवारी दिवसभरात चांदीने पुन्हा सर्वकालीन उच्चांक केला. चांदी तब्बल २० हजोर रुपयांनी महागली. आकाशाला गवसणी घालणाऱ्या चांदीचे दर पाहुन ग्राहकांच्या घशाला कोरड पडली. व्यावसायिकांमध्येही मोठी खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले.



# मुंबईचा महापौर मराठीच होणार...! ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा,

## राज ठाकरे म्हणाले माझ्याकडेही फडणवीसांचे खूप व्हिडिओ

वृत्तसंस्था। मुंबई

**मुंबई महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधूंनी अखेर एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात बीएमसी निवडणूक साठी युतीची घोषणा करण्यात आली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मुंबईतील वरळी येथील ब्लू सी हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेत युतीची औपचारिक घोषणा केली. यावेळी उद्धव आणि राज यांच्यासह संजय राऊतही व्यासपीठावर होते. तिघांनीही उपस्थितांशी संवाद साधला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार, असं राज ठाकरेंनी ठणकावून सांगितलं.**

‘उद्धव ठाकरे यांची ही शेवटची निवडणूक असेल, असं रावसाहेब दानवे म्हणाले होते. त्यावरुन पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, संजय राऊत म्हणाले की ते स्वतः निवडणुकीत पराभूत झाले. तर उद्धव ठाकरे म्हणाले, की आपण त्यांच्यावर बोलावं इतकीही त्यांची पातळी उरली नाही. तर राज ठाकरे यांनी देवांच्या प्रश्नांना उत्तरं द्यावीत, दानवांच्या प्रश्नांना नाही अशी कोटी करत हशा पिकवला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असंही राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितलं. मुख्यमंत्री अल्ला हाफिज बोलतानाचा एक व्हिडिओ फिरतोय. माझ्याकडे खूप व्हिडिओ आहेत, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.




### ➢ उद्धव ठाकरे म्हणाले

उद्धव ठाकरे म्हणाले की, ‘आमच्या दोघांचेही आजोबा, प्रबोधनकार ठाकरे हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील पहिल्या पाच सेनापतींपैकी एक होते. तसंच बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे यांच्यासह अख्खं ठाकरे घराणं संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात संघर्ष करत होतं. मात्र मुंबई महाराष्ट्राने मिळवल्यानंतर जेव्हा उपरे मराठी माणसाच्या उरावर नाचायला लागले तेव्हा न्याय हक्कांसाठी शिवसेनेची स्थापना करण्यात आली.

### ➢ राज ठाकरे काय म्हणाले?

**‘जाहीर सभा सुरु झाल्या की बाकी बोलायचं ते बोलू. पण माझी एक मुलाखत झाली होती, त्याची मुद्दाम आठवणूक करुन देऊ इच्छितो की, त्यात मी म्हटलं होतं की कुठल्याही भांडण किंवा वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. त्या वाक्यापासून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली.’ असं राज ठाकरे म्हणाले.‘कोण किती जागा लढवणार, आकडा काय, हे नाही सांगणार. महाराष्ट्रात लहान मुलं पळवणाऱ्या टोळ्या आहेत. त्यात दोन टोळ्या जास्त झाल्यात, ते राजकीय पक्षातील मुलं पळवतात. ज्याची अनेक दिवस वाट पाहिली जात होती, शिवसेना आणि मनसेची युती झाली हे आम्ही जाहीर करत आहोत.’ अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली.**

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुरुपसिंग नाईक यांचे निधन



● . धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातल्या अनेक योजना आणि विकास कांमामध्ये त्यांचा महत्त्वाचा आणि मोलाचा वाटा होता.

प्रतिनिधी । नवापूर

**महाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री तथा नवापूरचे माजी आमदार सुरुपसिंग नाईक यांचे २४ डिसेंबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ८८व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने नंदुरबार जिल्ह्यासह राज्यातील काँग्रेस पक्ष आणि राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे.**

सुरुपसिंग नाईक हे इंदिरा गांधी आणि गांधी कुटुंबीयांचे निकटवर्तीय मानले जात होते. पक्षाचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ख्याती होती.१९७० ते २०१९ पर्यंत जवळपास पाच दशके राज्याच्या राजकारणात सक्रिय असलेल्या नाईक यांनी आणीबाणीनंतर काँग्रेसची विचारधारा तळागाळात पोहोचवली आणि पक्षाला आदिवासीबहुल भागात मजबूत केले. आदिवासी युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे, शिक्षण आणि विकासाच्या कामात त्यांचा मोठा वाटा होता. राज्यातील समाजकार्यासाठी त्यांनी खासदारकीचा राजीनामा देऊन विधानसभेत प्रवेश केला . आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात त्यांनी (पान २ वर)

### ●पाच दशके राज्याच्या राजकारणात

सन१९७० ते २०१९ पर्यंत जवळपास पाच दशके राज्याच्या राजकारणात असतांना त्यांनी नवापूर सारख्या आदिवासी बहुल भागात शैक्षणिक संस्थांचे मोठे जाळे उभे करून आदिवासी युवकांना शिक्षणाचा प्रवाहात आणले. नवापूरला एमआयडीसीची स्थापना करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

# वस्तू व सेवा कर अधीक्षकास पाच लाखांची लाच घेताना अटक

● घरात सापडली १९ लाखांची रोकड, ७२ लाखांची मालमत्ता

वृत्तसंस्था । मुंबई

**केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाच्या मुंबई लेखापरिक्षण विभागातील अधीक्षकाला पाच लाख रूपयांची लाच घेताना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक अधिकार्यांनी २२ डिसेंबर रोजी रंगेहाथ अटक केली. एका खासगी कंपनीला लागू झालेला वस्तू व सेवा कर आणि त्यावरील दंडाची रक्कम कमी करण्याच्या नावाखाली या अधीक्षकाने लाच मागीतली होती.**

वास्तविक ही रक्कम अनावश्यक असून जाणीवपूर्वक त्रास देण्याचा हा प्रकार असल्याचा कंपनीचा दावा होता.दक्षिण मुंबईत मुख्यालय असलेल्या एका खासगी कंपनीचे लेखापरिषण अधीक्षक अंकित अग्रवाल यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये केले होते. लेखा परिक्षणामध्ये खूप त्रुटी आहेत.

तसेच कंपनीने कर चुकवेगिरी केली आहे, असा दावा केला होता. वस्तू व सेवा कर कमी




भरला असून त्यापोटी ९८ लाख रुपयांचा कर दंडासह अदा करण्यासाठी नोटीसही जारी केली होती. मात्र ही नोटीस कंपनीला मान्य नव्हती. त्यामुळे कंपनीने अग्रवाल यांची प्रत्यक्ष भेट घेतली.

ही रक्कम आपण कमी करु शकतो. मात्र त्यासाठी २० लाख रुपयांची लाच द्यावी लागेल, अशी मागणी केली.अन्यथा एव्हढी रक्कम भरावीच लागेल. नाहीतर कंपनीवर कारवाई करु अशी धमकीही दिली. चर्चेनंतर लाचेची रक्कम तडजोडीनंतर १७ लाख रुपये निश्चित करण्यात आली. लाचेचा पाच लाख रुपयांचा पहिला हप्ता सोमवारी आणून देण्यास सांगितले होते. सदर कंपनीच्या संचालकाने याबाबत सीबीआयकडे तक्रार दिली होती. त्यानुसार तक्रारीची शहानिशा केल्यानंतर सीबीआय अधिकाऱ्यांनी सापळा रचला. अधीक्षक अग्रवाल यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

त्यानंतर सीबीआय अधिकाऱ्यांनी कार्यालय तसेच निवासस्थानी झडती घेतली.

या अधीक्षकाच्या मुंबईतील निवासस्थानी केलेल्या तपासणीत १८ लाख ३० हजार रुपयांची बेहिशेबी रोकड आढळली. याशिवाय एप्रिल २०२५ मध्ये खरेदी केलेली ४० लाख रुपये तसेच ३२ लाख रुपये किमतीच्या मुंबई महानगर परिसरात खरेदी केलेल्या दोन मालमत्तांची कागदपत्रे आढळली.याबाबत सदर अधीक्षक समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही. त्यामुळे ही कागदपत्रे सीबीआयने ताब्यात घेतली आहेत. याशिवाय कार्यालयातील छाप्यात संबंधित कंपनीच्या लेखापरिक्षणाची डिजिटल प्रतही ताब्यात घेण्यात आली आहे. (पान २ वर)

### इशान–वैभव सूर्यवंशीलाही टाकले मागे

# ३२ चेंडूत शतक! सकीबुल गनीने मोडले विक्रम

वृत्तसंस्था । अहमदाबाद

सध्या सुरू असलेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला असून, एकाच दिवशी अनेक मोठे विक्रम मोडीत निघाले आहेत. बुधवारी अवघ्या काही तासांच्या अंतरात क्रिकेट विश्वाला तीन अतिवेगवान शतके पाहायला मिळाली. यामध्ये बिहारच्या सकीबुल गनीने अवघ्या ३२ चेंडूत शतक झळकावून स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान शतकाचा विक्रम आपल्या नावावर केला आहे.



दिवसाची सुरुवात बिहारच्या १४ वर्षीय युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी याच्या वादळी खेळीने झाली. वैभवने अवघ्या ३६ चेंडूत शतक पूर्ण करत खळबळ उडवून दिली. मात्र, त्याचा हा आनंद फार काळ टिकला नाही. काही तासांनंतर झारखंडचा कर्णधार इशान किशनने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर कर्नाटकविरुद्ध केवळ ३३ चेंडूत शतक ठोकून वैभवचा विक्रम मोडला. पण खेळाच्या अखेरीस बिहारचा कर्णधार सकीबुल गनीने या दोघांनाही मागे टाकले. गनीने अवघ्या ३२ चेंडूत शंभरी गाठून नवा इतिहास रचला. नुकतेच झारखंडला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकवून देणारा इशान किशन सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. या सामन्यात तो मधल्या फळीत सहाव्या (पान २ वर)

### ख्रिसमस पूर्वी शेअर बाजारात निराशा

वृत्तसंस्था । मुंबई


ख्रिसमसच्या सुट्टीपूर्वी भारतीय शेअर बाजारात बुधवारी निराशाजनक वातावरण पाहायला मिळाले. दिवसभर बाजार एका मर्यादित कक्षेत राहिल्याने आणि गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याने दोन्ही मुरा निर्देशांक लाल चिन्हात बंद झाले. व्यवहाराअंती मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ११६.१४ अंकांच घसरणीसह ८५,४०८.७० वर बंद झाला. दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३५.०५ अंकांच्या घसरणीसह २६, १४२.१० च्या पातळीवर स्थिरावला.

# अधिकृत प्रचार कालावधीनंतर जाहिरातींवर बंदी

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य निवडणूक आयोग आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठी अधिकृत प्रचार कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक, प्रिंट आणि इतर माध्यमांमधील सर्व निवडणूकांसंबंधित जाहिरातींवर बंदी घातली जाईल, असे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत बोलताना सांगितले.**

२९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, दुसऱ्या दिवशी मतमोजणी



होणार आहे. संबंधित कायद्यातील तरतुदींनुसार, मतदानाची वेळ संपण्याच्या ४८ तास आधी, म्हणजेच १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता निवडणूकांचा प्रचार संपणार आहे. त्यानंतर कोणत्याही माध्यमात निवडणुकीच्या जाहिराती प्रकाशित किंवा प्रसारित केल्या जाऊ शकत नाहीत. मतदानादिवशी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान (पान २ वर)

# लाडक्या बहिणींची सुरक्षा आता महिलांच्याच हाती!

## एसटी स्थानकांवर महिला रक्षकांचा खडा पहारा

वृत्तसंस्था । मुंबई

**एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व्हावा यादृष्टीने राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने एक पाऊल पुढे टाकले आहे. महिला प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी आता महिला सुरक्षा रक्षकांवर सोपवण्यात आली आहे.**

सध्या एसटी महामंडळाच्या ४८ प्रमुख बस स्थानकांमध्ये महिला सुरक्षा रक्षक आहेत. गेल्या नऊ महिन्यांत त्यांच्या माध्यमातून ७०६ घटनांचा




उलगडा करण्यात आला असून त्यापैकी ३० प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. येत्या काळात एसटी महामंडळाच्या सर्व बस स्थानकांवर महिला सुरक्षा रक्षकांची संख्येत वाढ केली जाईल. एसटी महामंडळाने प्रवाशांच्या विशेषत: महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत ४८ प्रमुख बसस्थानकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. त्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षेला बळकटी आली. एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता खात्याच्या माध्यमातून, महिला सुरक्षा रक्षकांनी प्रवाशांची सुरक्षा, घातपातापासून दक्षता, सामाजिक दृष्ट्या दुर्बळ घटकांबद्दल जागरूकता आणि प्रवाशांना मदत करणे ही महत्त्वाची कामे हाती घेतली. त्यानुसार जानेवारी २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत सर्व स्थानकांवर पाकीटमार, चोरी, महिला छेडछाड, घर सोडून आलेल्या महिलांना मदत, मनोरूग्णांना मदत यासारख्या ७०६ घटनांमध्ये सुरक्षा रक्षकांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. त्यापैकी ३० प्रकणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले.या कालावधीत १८२ प्रकरणांमध्ये महिला, विद्यार्थिनींची छेडछाड, महिलांचे दागिने, (पान २ वर)

**सुरक्षा रक्षकांना अधिक दक्ष राहण्याबाबत व कामगिरी सुधारण्याबाबत वारंवार सूचना देण्यात येतात. त्यानुसार सुरक्षा रक्षकांकडून कार्यक्षम आणि दक्षतेची कामगिरी सातत्याने होत आहे. परिणामी, सुरक्षा रक्षकांनी व महिला सुरक्षा रक्षकांनी केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे, महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होणाऱ्या घटनांना प्रभावीपणे आळा घालण्यात मोठे यश मिळाले आहे, असे एसटी महामंडळाने सांगितले.**

# काँग्रेसचा शरद पवारांच्या पक्षाला थेट अल्टिमेटम

वृत्तसंस्था । ठाणे

**ठाणे जिल्ह्यात महाविकास आघाडीत वादाची मोठी ठिणगी पडली आहे. शरद पवार यांच्या पक्षाचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ठाणे शहर अध्यक्ष अभिजीत पवार यांनी केलेल्या एका कृतीमुळे तिथे काँग्रेस पक्षाने चांगलीच आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेसने येथे शरद पवार यांच्या पक्षाला ४८ तासांचा अल्टिमेटमट दिला आहे. काँग्रेसला जागांचा प्रस्ताव न आल्यास आम्ही काहीतरी मोठा निर्णय घेऊ, असा थेट इशाराच काँग्रेसने येथे शरद पवार यांच्या पक्षाला दिला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार ठाण्यात महाविकास आघाडीमध्ये अद्याप अधिकृत जागावाटप झालेले नाही. असे असताना कळवा प्रभाग क्रमांक नऊमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ठाणे शहर अध्यक्ष अभिजित पवार यांनी पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान आणि ऋता आव्हाड यांच्या उपस्थितीत मोठी रॅली काढली. तसेच या रॅलीनंतर (पान २ वर)

## थोडक्यात

### गुप्ता यांचे माहिती अधिकारावर व्याख्यान




**जळगाव ।** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव स्टार्स आणि रोटरी क्लब ऑफ जळगाव रॉयल्स यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते दीपक गुप्ता यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला रोटरी स्टार्सचे अध्यक्ष विपुल पटेल, सचिव हितेश सुराणा, रोटरी रॉयल्सचे अध्यक्ष जितू भोजवानी, सचिव गणेश वर्मा उपस्थित होते. यावेळी गुप्ता यांनी, माहितीचा अधिकार कायदाबाबत मार्गदर्शन केले. तसेच जळगाव शहराच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर संवाद व चर्चा करण्यात आली. परिचय धनराज कासट यांनी तर सूत्रसंचालन व आभार सागर मुंदडा यांनी केले.

### भारतीय संस्कृती व संस्कारमूल्य उपक्रम

**जळगाव ।** श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील पूर्व-प्राथमिक व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी नाताळ सणाऐवजी 'भारतीय संस्कृती व संस्कारमूल्य उपक्रम' राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बालगीत, कृतीगीत व छोट्या कविता सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. सत्य, स्वच्छता, आई-वडिलांचा आदर, गुरुजनांचा सन्मान यावर आधारित लहान संवाद व गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कारांचे महत्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व संतांच्या चित्रांचे दर्शन घेतले. इयत्ता दुसरीचा विद्यार्थी आदित्य संजय लोहार यांनी संत गाडगेबाबा यांची भूमिका साकारलेली होती.

# शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचणे आवश्यक : *जिल्हाधिकारी घुगे*

**● एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी पार पडली जिल्हास्तरीय समन्वय बैठक**

**प्रतिनिधी । जळगाव**

**एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी अचूक सर्वेक्षण, प्रभावी विभागीय समन्वय आणि संवेदनशील प्रशासनिक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे, अशा सुचना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी बुधवारी (दि.२४) दिल्या.**




जिल्ह्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्वेक्षणाबाबत पुढील दिशानिर्देश निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी या सुचना केल्या.

बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रफीक हुरमत रुबाब तडवी यांच्यासह नगर विकास विभागाचे सहायक आयुक्त, तहसिलदार (संगायो) आदी अधिकारी उपस्थित होते.

सर्वेक्षणातून पात्र महिलांची अचूक माहिती संकलित करून त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना ठरविण्यात आल्या. तसेच विविध विभागांमधील समन्वय अधिक सक्षम करून सर्वेक्षण प्रक्रिया पारदर्शक, वेळबद्ध व परिणामकारक करण्याबाबत स्पष्ट दिशानिर्देश देण्यात आले. या बैठकीद्वारे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी संरचित सर्वेक्षण, योजनांचा प्रभावी लाभ व प्रशासनिक समन्वय या दिशेने ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला.

**■ सर्वेक्षणाच्या कार्यपध्दतीवर चर्चा**

बैठकीत जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागातील एकल महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत, ४० वर्षांवरील अविवाहित, दिव्यांग तसेच निराधार अवस्थेत एकट्या राहणाऱ्या महिलांचे सर्वेक्षण करताना अवलंबावयाची एकसंध व सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## 'जळगाव प्रथम'मार्फत शहराच्या विकासासाठी सर्वधर्मीय प्रार्थना




**प्रतिनिधी । जळगाव**

**शहराच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी जळगाव प्रथम या अराजकीय चळवळीच्या वतीने सर्वधर्मीय प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमात मुफ्ती हारून नदवी, पंडित विश्वनाथ जोशी, ग्यानी विनोदसिंग राठोड, जैन प्रसारक मयूर कोठारी व पोस्टर फादर सुरेश यांच्याहस्ते शहराच्या विकासासाठी सर्वधर्मीय प्रार्थना फलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक धर्मगुरूंनी आप-आपल्या देवतास शहराच्या प्रगती, शांतता व सदभावनेसाठी प्रार्थना केली.

यावेळी बोलताना जळगाव प्रथमचे संस्थापक संयोजक माजी आ. ॲड. जयप्रकाश बाविस्कर म्हणाले की, जळगाव शहराचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल तर महानगरपालिकेच्या कारभारात तरुण-तरुणींना निर्णायक भूमिका देणे अत्यावश्यक आहे, असे सांगून मतदार यादी अद्ययावत नसल्यामुळे मतदानाचा टक्का घटत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर नोंदवली गेल्याचे प्रकार प्रत्यक्षात दिसून येतात, असे सांगत त्यांनी आपल्या घरातील मतदार यादीचा संदर्भ दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी ॲड. बाविस्कर यांनी जळगाव शहराच्या विकासासाठी तयार करण्यात आलेली सर्वधर्मीय प्रार्थना शहरातील घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प जाहीर केला.

## गरजू रुग्ण, व्यक्तींना ब्लँकेट, स्वेटरचे वाटप

**● रोटरी क्लब जळगाव सेंट्रलचा सामाजिक उपक्रम**

**प्रतिनिधी । जळगाव**

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे सिव्हिल हॉस्पिटल येथे गरजू रुग्ण व व्यक्तींना ब्लँकेट, स्वेटर, कानटोपी याचे वितरण करण्यात आले.**



सध्या थंडीचे प्रमाण प्रचंड वाढलेले असल्यामुळे गरजू व्यक्तींना त्यापासून संरक्षण मिळावे व त्यांचे आरोग्य चांगले राहावे या सामाजिक भावनेतून रोटरी सेंट्रलतर्फे हा उपक्रम राबविण्यात आल्याचे अध्यक्ष जितेंद्र बरडे यांनी सांगितले.

याप्रसंगी रोटरी सेंट्रलचे संस्थापक अध्यक्ष डॉ.नरेंद्र जैन, माजी अध्यक्ष डॉ.राहुल मयूर, विपुल पारेख, प्रकल्प प्रमुख कल्पेश दोशी, मानद सचिव ॲड.केतन ढाके, महेंद्र गांधी, समर्थसिंग पाटील, शामलाल कुकरेजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी रोटरी सेंट्रलचे मिलन मेहता, हरीश ठक्कर, निलेश सुरतवाला, सुनील बाफना, महेश गदोडिया, अमित अग्रवाल, शामकांत वाणी, मनोज पाटील, जतिन ओझा, ललित मल्हारा, डॉ.चंद्रकांत साळुंखे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## शिवसेना-मनसे युतीचा जळगावात जल्लोष

**प्रतिनिधी । जळगाव**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मुंबई येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत शिवसेना-मनसे युतीची अधिकृत घोषणा करण्यात आली. युतीची घोषणा होताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे बुधवारी (२४) जल्लोष करण्यात आला.**



याप्रसंगी मनसेचे जिल्हाध्यक्ष जमील देशपांडे, महानगराध्यक्ष किरण तळेले, विनोद शिंदे, उपशहराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे. चेतन पवार, ललित शर्मा, प्रकाश जोशी, राजेंद्र निकम, विभाग अध्यक्ष उमेश अठरे, विभाग अध्यक्ष विशाल जाधव, दीपक राठोड, राहुल चव्हाण, आशुतोष जाधव, पंकज राजपूत, पियुष गुजर, सचिव जितेंद्र पाटील, राहुल ठाकूर, प्रसिद्धी प्रमुख सतीश सैंदाणे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष योगेश पाटील, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष रजाक सय्यद, समीर लालाभाई, अन्नू भिस्ते, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, संदीप मांडोळे, शाखा अध्यक्ष अनिता कापुरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. युती जाहीर होताच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी व फुलांची उधळण करत आनंद व्यक्त केला. ठाकरे बंधू एकत्र आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक वळण लागले असून, मराठी माणसाच्या हितासाठी ही युती महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी । जळगाव**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशनानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्यावतीने एमआयडीसी भागातील विविध प्रकारच्या औद्योगिक क्षेत्रात आगी व रासायनिक आपत्तींच्या नियंत्रणासाठी तसेच जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी नुकतेच विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

## पान १ वरुन

**सुरुपसिंग नाईक यांचे निधन...**

१९६२ मध्ये नवापूर तालुक्यातील सुकवेल ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच पदापासून सुरु केली.१९६५ साली ते धुळे जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून आले. १९७२ साली नवापूर विधानसभा मतदारसंघात ११ मार्च १९७२ साली मोठ्या मताधिक्याने निवडून आले. आणीबाणीचा काळात त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून मार्च १९७७ साली प्रथमच नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे तिकिट मिळाले. १९८० साली त्यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आणि ते लोकसभेत पोहचले. इंदिरा गांधीनी त्यांच्यातील प्रतिभा ओळखून त्यांना २५ सप्टेंबर १९८० रोजी महाराष्ट्र मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिली. मंत्री झाल्यावर त्यांना समाजकल्याण व आदिवासी विकास खाते देण्यात आले. तेव्हापासून २००९ पर्यत सातत्याने ते नवापूर मतदारसंघातून विधानसभेत पोहचले. या कालावधीत आदिवासी विकास, समाज कल्याण, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क, वन व बंदरे अशा अनेक खात्यांचे मंत्रीपद त्यांनी भूषविले.२००९ मध्ये डॉ. विजयकुमार गावित यांचे बंधू शरद गावितांनी त्यांचा पहिल्यांदा पराभव केला. मात्र पराभवाने न खचता न थकता त्यांनी जिद्दीने लढा देत २०१४ मध्ये शरद गावितांनाच पराभूत करत ते पुन्हा विधानसभेत पोहचले.

**वस्तू व सेवा कर अधीक्षकास....**

ही प्रत अग्रवाल यांच्या कार्यालयातील संगणकामध्ये आढळली आहे. ही अधिकृत आहे का, याची तपासणी केली जात आहे.वस्तू व सेवा कर विभागाच्या लेखा परिक्षण विभागातून कर चुकवेगिरीच्या नावाखाली नोटिसा पाठविल्या जात आहेत आणि त्यापोटी लाच मागितली जात असल्याच्या तक्रारी सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आल्या आहेत. संबंधितांनी लाच न देता तक्रार करावी असे आवाहन सीबीआयने केले आहे.

**अधिकृत प्रचार कालावधीनंतर ......**

होईल. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकानी यांनी बैठकीत सविस्तर सादरीकरण केले. ते म्हणाले, उमेदवाराचे नाव संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे. सूचक आणि अनुमोदक त्याच प्रभागाचे रहिवासी असले पाहिजेत, ज्या प्रभागातून उमेदवार निवडणूक लढवत आहे.पक्षीय उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांना प्रत्येकी एक सूचक आणि एक अनुमोदक आवश्यक असतो. उमेदवार एकापेक्षा जास्त प्रभागांतून उमेदवारी अर्ज दाखल करू शकतो, परंतु तो फक्त एकाच जागेवरून निवडणूक लढवू शकतो. एका जागेसाठी जास्तीत जास्त चार उमेदवारी अर्ज दाखल केले जाऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

**लाडक्या बहिणींची सुरक्षा.....**

पैसे चोरणे, मनोरुग्ण महिलांना व घर सोडून आलेल्या महिलांना मदत करणे, अशा विविध गुन्हेगारी व सामाजिक स्वरूपाच्या घटनांना सुरक्षा रक्षक व महिला सुरक्षा रक्षकांनी अत्यंत दक्षतेने हाताळून चांगली कामगिरी केली.

**३२ चेंडूत शतक! ......**

क्रमांकावर फलंदाजीला आला. इशानने ३९ चेंडूत ३२०.५१ च्या स्ट्राईक रेटने १२५ धावा कुटल्या. या खेळीत त्याने ७ चौके आणि १४ उत्तुंग षटकार लगावले. त्याच्या या खेळीमुळे झारखंडने ५० षटकांत ४१२ धावांचा डोंगर उभा केला. इशानच्या या फॉर्ममुळे २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघात त्याच्या निवडीची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.

**काँग्रेसचा शरद पवारांच्या....**

परस्पर उमेदवारी अर्ज दाखल केला. अभिजित पवार यांच्या याच कृत्यावर काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादीचे हे वर्तन आघाडीच्या भवितव्यासाठी पोषक नसून आघाडीत बिघाडी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला वर्तनात सुधारणा करावी, असा इशाराच ठाणे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी दिला आहे. तसेच ४८ तासांच्या आता आघाडीचा प्रस्ताव न आल्यास आम्ही वेगळा विचार करू, असेही चव्हाण यांनी सांगितले.

## जळगाव ओपन राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेला सुरुवात

**● राज्यभरातून २४३ खेळाडूंचा सहभाग; २८ डिसेंबरपर्यंत रंगणार स्पर्धा**

**प्रतिनिधी । जळगाव**

**जिल्हा बॅडमिंटन व जैन स्पोर्टस अकॅडमी आयोजीत योनेक्स सनराइज जी.एच. रायसोनी 'जळगाव ओपन २०२५' बॅडमिंटन टूर्नामेंटचे उद्घाटन बुधवारी (दि.२४) जिल्हा क्रीडा संघाच्या बॅडमेंटन हॉल येथे करण्यात आले.**



रायसोनी फाउंडेशन स्पोर्ट्स ॲण्ड कल्चर प्रायोजित व जैन इरिगेश सिस्टीम्स लि. व जळगाव जिल्हा क्रीडा संघ सहप्रायोजीत ही स्पर्धा महाराष्ट्र बॅडमिंटन संघटनेकडून मान्यता प्राप्त आहे. ही स्पर्धा २४ ते २८ डिसेंबर दरम्यान होत आहे. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी रायसोनी फाउंडेशन स्पोर्ट्स ॲण्ड कल्चरचे प्रीती अग्रवाल, जी.एच. रायसोनी कॉलेजचे रफिक शेख, जळगाव जिल्हा क्रीडा संघाचे सहसचिव सचिन गाडगीळ, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे रवींद्र धर्माधिकारी, मुख्य पंच ब्रिजेश गौर, जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे शेखर जाखेटे, जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव विनीत जोशी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सचिव विनित जोशी यांनी केले. स्पर्धेत जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहिल्यानगर, संभाजीनगर, अकोला, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यातील २४३ खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. हे खेडाळू ९, ११, १३, १५, १७, १९ वर्षा आतील मुले व मुली एकेरी तसेच १९ वर्षावरील खुलागट आणि ३५ वर्षावरील वरिष्ठ गटात खेळत आहे.

**■ खेळाडूंना मिळतेय व्यासपीठ : अग्रवाल**

यावेळी बोलतांना प्रीती अग्रवाल यांनी, जैन स्पोर्टस अकॅडमीच्या माध्यमातून जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन व सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांच्या प्रयत्नातून अनेक खेळाडूंना व्यासपीठ मिळत आहे. नॅशनल लेव्हलच्या स्पर्धांचे नियोजन जैन स्पोर्टस अकॅडमीच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांने उत्तम होत असल्याचे सांगितले.

## दोन दिवसात १३९५ उमेदवारी अर्ज विक्री

**प्रतिनिधी । जळगाव**

शहर महानगरपालिका निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज विक्रीसह दाखल करण्याच्या प्रक्रियेला मंगळवार (दि.२३) पासून सुरुवात झाली. पहिल्या दिवशी ७७७ तर दुसऱ्या दिवशी ६१८ अशा १३९५ अर्जांची विक्री झाल्याची माहिती मनपा प्रशासनाकडून देण्यात आली.

मनपा निवडणूक जाहीर झाल्यानंतर इच्छुकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणपत्रे तसेच थकबाकीदार नसल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी महापालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांमध्ये मोठी लगबग दिसून येत आहे.

# धैर्याने उभे राहिलात तर मार्ग नक्कीच निघतो

**● बालविश्व स्कूलच्या स्नेहसंमेलनात शौर्यकन्या हाली बरफ यांचा विद्यार्थिनींना सल्ला**

**प्रतिनिधी । जळगाव**

**आज मुलींवर अत्याचार होतात, हुंडाबळी दिले जातात. या समाजातील नराधमांविरुद्ध मुलींनी गप्प न बसता आवाज उठवला पाहिजे. तुम्ही स्वतःला कमजोर समजू नका, धैर्याने उभे राहिलात तर मार्ग नक्कीच निघतो, असा सल्ला हाली बरफ यांनी विद्यार्थीनींना दिला.**



२०१३ मध्ये आपल्या बहिणीला बिबट्यापासून वाचवल्याबद्दल 'राष्ट्रीय शौर्य पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आलेल्या हाली बरफ या बालविश्व स्कूलच्या स्नेहसंमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या, या वेळी त्यांनी विद्यार्थीनींशी संवाद साधतांना हा सल्ला दिला. याप्रसंगी अध्यक्ष संदीप चौधरी, संस्थापिका भारती चौधरी, संचालक सौरभ चौधरी, मुख्याध्यापक फरमान तडवी आणि क्रीडा शिक्षक धीरज जावळे उपस्थित होते.

पुढे बोलतांना हाली यांनी 'त्या' आठवणींना उजाडा दिला. मी आणि माझी बहीण शकुंतला लाकडे वेचत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक शकुंतलावर झडप घातली. तिचे डोके बिबट्याच्या जबड्यात होते. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बहिणीला पाहून मी पळून जाऊ शकले असते, पण मी तिथेच थांबले. माझ्याकडे शस्त्र नव्हते, पण हिंमत होती. मी आजूबाजूचे दगड उचलून बिबट्यावर मारा सुरू केला. आरडाओरडा केली. अखेर बिबट्याला माघार घ्यावी लागली आणि माझ्या बहिणीचे प्राण वाचल्याचे त्यांनी सांगितले.

**■ रोजंदारीवर करावे लागलेय काम :** हाली बरफ यांनी दाखविलेल्या हिम्मतीबद्दल त्यांना २०१३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याहस्ते राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या घटनेनंतर इयत्ता चौथीच्या पुस्तकामध्ये हालीच्या साहसाचा धडा शिकवला जातो. पण आजची परिस्थिती खूप वेगळी आहे. इतकी मोठी ओळख असूनही हाली यांना आजही ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील एका वसतिगृहात रोजंदारीवर काम करावे लागत असल्याची खंत मान्यवरांनी व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# कोणाचेही तिकीट फायनल नाही, सर्व्हेंनंतरच निर्णय

## आ.अनुप अग्रवाल यांची बैठकीत माहिती; भाजपाचचं काम करु, कार्यकर्त्यांकडून घेतले वदवून

प्रतिनिधी । धुळे



**भारतीय जनता पक्षातर्फे महापालिका निवडणुकीसाठी कोणाचेही तिकीट फायनल नाही. अजून सर्व्हे होतील. त्यानंतरच निर्णय होईल. हा निर्णय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची कोअर कमिटी घेईल. आपल्या समोर युती किंवा महायुतीत लढायचं हा पेच आहे. तुम्हाला युती नको आहे ना, मग शब्द द्या, भाजपाचचं काम करु असे शहराचे आ. अनुप अग्रवाल यांनी कार्यकर्त्यांकडून वदवून घेतले.**

**महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने चाळीसगाव रोडवरील भाजपाच्या नवनिर्मित कार्यालयात व्यापक बैठक झाली.** या बैठकीत इच्छूकांसोबत भाजपाच्या नेत्यांनी संवाद साधला. त्यावेळी आ. अग्रवाल बोलत होते. आ. अग्रवाल म्हणाले की, आम्ही प्रभागनिहाय इच्छूकांच्या बैठका घेतल्या. मात्र तिकीटाकसंदर्भातील अंतिम निर्णय हा अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३० तारखेला होईल. प्रभागातून उमेदवार निश्चिती संदर्भात पक्षातर्फे येत्या दोन तीन दिवसात आणखी सर्व्हे होतील. तिकीट वाटपासंदर्भात पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत सात सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती तिकीट फायनल करेल. महापालिका निवडणुक भाजपाने स्वबळावर लढायची की युती महायुतीतून त्यावर मार्ग काढायचा आहे. तुम्हाला युती हवी किंवा नको, अशी विचारणा करताच उपस्थितीत इच्छूकांमधून युती नको, असा सुर उमटला. तोच धागा पकडत भाजपाचेच काम करु असा शब्द द्या, असे अग्रवाल म्हणाले. युती महायुतीसंदर्भात वरिष्ठांचे आदेश अद्याप बाकी असल्याचे आ. अग्रवाल म्हणाले. उमेदवार निवडताना चुक होवू नये, म्हणून आपण सर्व्हे करीत आहोत, ज्यांना तिकीट मिळणार नाही. त्यांनी नाराज व्हायचे कारण नाही. अशा इच्छुकांना प्रभागात नगरसेवकांपेक्षा देखील जास्त काम देवू ज्यामुळे पुढील निवडणुकीत त्यांचे तिकीट फायनल होवू शकेल. लोकसंख्येच्या निकषानुसार पुढील पंचवार्षिकमध्ये महापालिकेत आणखी १५ नगरसेवक सामावले जातील. त्यामुळे संधी ही मिळणार असल्याचे आ. अग्रवाल म्हणाले.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर म्हणाले की, आपल्याकडे ५५० इच्छूक आहेत. तिकीट मात्र ५५-६० देता येतील. म्हणून ज्याला तिकीट मिळाले नाही, तो सक्षम नाही असं मानु नये. तिकीटासाठी सर्व्हे महत्वाचा आहे. कालच जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार रावल आले होते. त्यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करण्यात आली आहे. इच्छूक उमेदवारांच्या तिकीटसंदर्भात आमची कोअर कमिटी निर्णय घेईल, शेवटच्या क्षणी हा निर्णय घेतला जाईल. त्यामुळे इच्छुकांची इच्छा असली तरी त्यांना पक्षाचा फॉर्म भरता येणार नाही. सर्वच कार्यकर्त्यांनी भाजपासोबत रहावं अशी आमची इच्छा असल्याचे अंपळकर म्हणाले.

या बैठकीत किरण जोंधळे, स्थायी समितीचे माजी सदस्य हर्षकुमार रेलन, भिकन वराडे, राजू महाराज, भगवान देवरे, संजय बोरसे, यांच्यासह अनेकांनी आम्हाला पक्षाचे तिकीट मिळाले नाही तरी आम्ही नाराज होणार नाही, पक्षाचे काम करु असे सांगितले. या बैठकीला पालकमंत्री ना. जयकुमार रावल, आ. अनुप अग्रवाल, आ. राम भदाणे, मा.आ. राजवर्धन कदमबाडे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, डॉ. सुशिल महाजन, माजी महापौर चंद्रकांत सोनार, जयश्री अहिरराव, प्रदीप कर्पे, मनपा निवडणुकीसाठी भाजपची कोअर कमिटी धुळे । येथील महापालिकेच्या १५ जानेवारीला होत असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या आदेशाने भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीची आज स्थापना करण्यात आली. भारतीय जनता पक्ष येथील महापालिकेच्या निवडणुकीत ७४ पैकी किमान ६० जागांवर उमेदवार देणार आहे. यातच भाजपतर्फे उमेदवारीसाठी तब्बल ५५० इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीही दिल्या आहेत. यात प्रत्येक प्रभागात सरासरी २५ ते ३० उमेदवार इच्छुक आहेत. यामुळे या निवडणुकीबाबत संचलन करण्याच्या उद्देशाने आज पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या आदेशाने भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली. या कोअर कमिटीत पालकमंत्री रावल यांच्या नेतृत्वात शहराचे आमदार अनुप अग्रवाल, माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, माजी आमदार कुणाल पाटील यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी जिल्हाध्यक्ष नारायण पाटील यांचा विशेष आमंत्रित सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### शेतकऱ्यांच्या खळ्यातून ८ क्विंटल सोयाबीन लंपास

**साक्री ।** तालुक्यातील धनेर येथील शेतकऱ्यांच्या खळ्यातून चोरट्यांनी ८ किंटल सोयाबीन लंपास केले. त्यांची किंमत ३२ हजार रूपये इतकी लावण्यात आली आहे. याप्रकरणी पिंपळनेर पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत लहु विश्वनाथ पाटील (वय ५५ रा. धनेर) या शेतकरयाने पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१७ ते १८ नोव्हेंबरदरम्यान त्यांच्या गावालगत असलेल्या शेतातून अज्ञात चोरट्यांनी ८ किंटल सोयाबीन भरलेल्या गोण्या चोरून नेत्या काही जाहे तपास एएसआय पिंपळे करीत आहेत.

### शहरात थंडीचा जोर, पारा ७ अंशावर

**धुळे ।** गेल्या दोन आठवड्यांपासून शहर आणि जिल्ह्याला थंडीने अक्षरशः झोडपून काढले आहे. गेल्या १७ दिवसांपासून तापमानाचा पारा १० अंशांच्या खालीच असल्याने धुळे जिल्हा गारठला आहे. मंगळवारी तापमानाचा पारा ७ अंशापर्यंत खाली आला होता. गेल्या १७ दिवसांपासून तापमान हे १० अंशाच्या खालीच आहे. सोमवारी तापमानात काही प्रमाणावर वाढ होवून ते ७ इतके झाले होते. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. परंतु मंगळवारी तापमानाचा पारा ८ पॉइंटने कमी होऊन ७ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. त्यामुळे थंडी पुन्हा जाणवत आहे. सोमवारपर्यंत थंडीचा जोर कायम राहणार असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. ईशान्येकडून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे तापमानात घट झाली आहे. काही दिवस तापमानात घट होणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

### तरुणीचे फोटो व्हायरल करून बदनामी

**धुळे ।** जुन्या कायदेशीर वादाचा राग मनात धरून एका २० वर्षीय तरुणीचे खासगी फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल करून तिची बदनामी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तालुक्यातील न्याहळोद येथील एका संशयित तरुणाविरुद्ध सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणी हिच्या नावाने संशयित तरुणाने इन्स्टाग्रामवर एक बनावट खाते उघडले. तसेच त्याच्या स्वतःच्या इन्स्टाग्राम आयडीवरून पीडितेचे तिच्या संमतीशिवाय स्वतःसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. या बदनामीमागे जुना वाद कारणीभूत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यापूर्वी पीडित तरुणीने देवपूर पोलीस ठाण्यात संशयित तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला होता.

# नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी पदभार स्वीकारला

## मुख्याधिकारी विक्रम जगदाळे यांनी केले स्वागत



प्रतिनिधी । धुळे

**तळोदा येथील नगर पालिकेच्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी मंगळवारी आपला पदभार स्विकारला. त्यांनी कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्येकाकडील कामकाजाची माहिती घेऊन आढावा घेतला. गतिमान कामकाजाच्या सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान मुख्याधिकारी विक्रम जगदाळे यांनी त्यांचे स्वागत केले.**

तळोदा नगर पालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी या पालिकेच्या निवडणुकीत निवडून आल्यानंतर त्यांनी मंगळवारी आपल्या नव निर्वाचित नगरसेवकांसह पालिकेच्या कार्यभार हाती घेतला. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम जगदाळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी योगेश चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा नेत्या प्रतिभा शिंदे, लक्ष्मण चौधरी, नगरसेवक कल्पेश चौधरी, रामानंद ठाकरे, इम्रान खाटिक, अरविंद प्रधान, नगरसेविका शीतल पाडवी, प्रतिभा पाडवी, हर्षाबाई पाडवी, गायत्री पिंपरे, लक्ष्मी नाईक, मीराबाई कोळी आदी नगरसेवकांसह प्रशासन अधिकारी कमलेश काळे उपस्थित होते. दरम्यान, नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी पालिका कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्येक कर्मचाऱ्यांकडून त्यांचा कामाची माहिती घेऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांनी आपली कामे तत्पर व पारदर्शीपणे करण्याचा सूचना दिल्यात.

# शिवस्मारकाची जागा हडपण्याचे कुटील कारस्थान : माजी आ.अनिल गोटे

## • न्यायालयात बोगस प्रतिज्ञापत्र दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यांना नोटीसा

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील मनोहर टॉकीज जवळील छत्रपती शिवरायांच्या स्मारकाला आमचा विरोध नसून आमचा विरोध केवळ जागा हडपण्याला आहे. स्मारकाच्या आड ३५८८ चौरस फूट जागा हडपून आपले धंदे चालू ठेवण्याचे कुटील कारस्थान उघडे पाडल्याने त्यांचा जळफळाट झाला आहे. छत्रपतींच्या स्मारकासंदर्भात न्यायालयात बोगस खोटी आणि लबाडीचे प्रतिज्ञापत्र दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यांना नोटीसा दिल्याची खळबळजनक माहिती धुळ्याचे माजी आ. अनिल गोटे यांनी दिली आहे.**

माजी आ. गोटेंनी आज पत्रकार परिषद घेतली. ते म्हणतात की, छत्रपतींच्या शिवरायांच्या स्मारकाला विरोध हा विरोधकांचा दृष्ट प्रचार आहे. आमचा स्मारकाला विरोध नाही, आम्ही स्वतः शिवस्मारक बांधले आहे. छत्रपतींच्या जीवनावर पुस्तक लिहिले आहे. आमचा पुतळ्याला विरोध नाही. १० पुतळे उभे करा, परंतु स्मारकाच्या आडून साडेतीन हजार चौरस फुट जागा हडप करण्याचा इरादा आम्ही सफल होवू देणार नाही.

न्यायालयात स्मारकाच्या जागे प्रकरणी बोगस खोटी आणि लबाडीची प्रतिज्ञापत्रे दाखल करण्यात आली आहे. अशा संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांकडे मी परवानगी मागितली आहे. तसेच अतिक्रमण करुन बांधकाम केल्याप्रकरणी १ कोटी २४ लाख रुपये वसुली का करण्यात येवू नये. तसेच तुमच्याविरुध्द कायदेशीर कारवाई का करण्यात येवू नये अशा नोटीसा संबंधीत अधिकार्यांना आजच पाठविल्याचे माजी आ. गोटेंनी म्हटले आहे.

शिवस्मारकाच्या जागेच्यावादा प्रकरणी आम्ही न्यायालयात दाद मागण्यासाठी गेलो असता, बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अनिल पवार, तत्कालीन मनपा आयुक्त श्रीमती अमिता दगडे पाटील यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करुन न्यायालयाची दिशाभुल केली. औरंगाबाद उच्च न्यायालयात आम्ही गेलो, दि. ३ डिसेंबर रोजी शिवस्मारकाच्या बांधकामाची जागा नेमकी कुठली आहे हे प्रतिज्ञा पत्रावर सांगण्याचे आदेश हायकोर्टाने दिले. या आदेशानंतर मनपा आणि जिल्हाधिकारी कार्यालयात प्रचंड खळबळ उडाली. आयुक्तांनी ४ डिसेंबर रोजी नगरभुमापन अधिकाऱ्यांना पत्र लिहून सदर जागा पुर्नगठण करण्याची विनंती केली आहे. जिल्हा पोलिस अधिक्षकांनी दाखल केलेल्या अहवालात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा चबुतरा छ. शाह नाट्यमंदिराच्या आवारात बांधला जात असल्याने व चारही बाजूला भिंती असल्यामुळे वाहतुकीला अडथळ्याचा प्रश्न उदभवत नाही, असे बेधक खोटे आपल्या लेखी उत्तरात म्हटले आहे. त्यामुळे पुतळा समितीच्या सदस्यांना आम्ही नोटीसा पाठविल्या आहेत. या पत्रकार परिषदेला शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, माजी महापौर भगवान करनकाळ, उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी, महानगरप्रमुख धिरज पाटील, तेजस गोटे उपस्थित होते.

# सारंगखेडा यात्रेहून परतताना अपघातात चालक ठार

प्रतिनिधी । धुळे

**शहादा तालुक्यातील सारंगखेडा येथील यात्रेहून परतांना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात बहादरपूर येथील तरूण चालक ठार झाला. तर चार जण जखमी झाले. हा अपघात दि. २१ रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास निमगुळ गावाजनीक झाला. याबाबत दोंडाईचा पोलिसात नोंद झाली आहे.**

विनोद नाना ठाकरे (वय ३० रा. बहादुरपूर ता. पारोळा जि. जळगाव) असे मयत तरूणाचे तर रॉकी शंकर परदेशी (वय ३२), सुनिल रामकृष्ण महाजन (वय २८), गौरव अनिल महाजन (वय २७), जितेंद्र विलास नावे आहेत. हे पाचही जण दि. २१ रोजी कारने सारंगखेडा यात्रेला गेले होते. विनोद ठाकरे हा कार चालवित होता. तेथून परतत असतांना निमगुळ गाव शिवारात पेट्रोलपंपाजवळ ठाकरे यांचे कारवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव कार थेट झाडावर आदळली. या भिषण अपघात विनोद ठाकरे याचा जागीच मृत्यू झाला. तर इतर चौघे गंभीर जखमी झाले. पाचही जणांना ग्रामस्थांनी दोंडाईचा उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. अपघातांची नोंद दोंडाईचा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

**विविध अपघातात दोन तरुण ठार**

साक्री तालुक्यात विविध अपघातात दोन तरुण ठार झालेआहेत. निजामपूर उभरांडी रस्त्यावर झालेल्या दुचाकी अपघातात किरण राजेंद्र भिल (वय १९) रा.घोडदे ता. साक्री या तरुणाचा मृत्यू झाला. दि.२२ रोजी रात्री ९ वाजता हा अपघात झाला. निजामपूर पोलिसात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. तपास पोहेकॉ. मालचे करीत दूसरा अपघात दि.२१ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता नंदुरबार साक्री रस्त्यावर टिटाणे फाट्याजवळ झाला. विनोद बंडू गांगुर्डे (वय ३२) रा. आंबेमोहर ता. साक्री हा तरुण टिटाणे फाट्याजवळ रस्ता ओलांडत असताना त्याला क्रुझरने धडक दिली. या अपघातात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी संदीप गांगुर्डे यांनी दिलेल्या तक्रारीवरून निजामपूर पोलिसात क्रुझर चालकाविरुध्द गुन्हा नोंद झाला आहे.

### ऐतिहासिकवारसा स्थळांना क्षेत्रभेट

**शिरपूर ।** येथील आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या थाळनेर गावास शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी थाळनेरचा प्राचीन किल्ला, पुरातन वास्तू, ऐतिहासिक मंदिरे तसेच तापी नदीच्या काठावरील भौगोलिक व ऐतिहासिक वैशिष्ट्यांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. या भेटीत विद्यार्थ्यांनी गावातील ज्येष्ठ व जाणकार नागरिकांशी संवाद साधून थाळनेरच्या इतिहासाविषयी माहिती घेतली. या शैक्षणिक उपक्रमासाठी महाविद्यालयातील समुदाय संपर्क सामाजिक उपक्रम विभागाचे सहाय्यक प्राध्यापक किशोर गुंजाळ, डॉ.व्ही.एस. पुराणिक, प्रा.डॉ. सुरेखा जाधव हे विद्यार्थांसोबत उपस्थित होते.

# चोरट्यांचा उच्छाद, पोलीस गस्त वाढवा; माजी आ.कुणाल पाटील यांची मागणी

प्रतिनिधी । धुळे

**तालुक्यात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून चोरीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे चोरट्यांचा बंदोबस्त करुन पोलिस खात्याने रात्रीची गस्त वाढवावी तसेच आतापर्यंत झालेल्या चोऱ्यांचा तातडीने छडा लावून चोरट्यांना जेरबंद करावे. दरम्यान तपासातून मिळालेला मुद्देमाल शहानिशा करुन तत्काळ मुळ मालकास परत करावा अशी मागणी माजी आ. कुणाल पाटील यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे केली आहे.**

तालुक्यात वाढत्या चोऱ्यांचे प्रमाण लक्षात घेता चोरट्यांचा युध्दपातळीवर बंदोबस्त करण्याची मागणी कुणाल पाटील यांनी केली आहे. धुळे तालुक्यात चोरट्यांनी उच्छाद मांडलेला आहे. चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. थंडीचे प्रमाण वाढल्याने ग्रामस्थ रात्रीला घराचा आसरा घेत आहेत. वाढत्या थंडीचा फायदा घेवून चोरटे संधी साधत आहेत. कुसुंबा, बोरीस, अवधान, अकलाड यांच्यासह धुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये चोऱ्यांचे प्रकार घडले आहेत. रोख रक्कमेसह दागदगिने लंपास करीत आहेत. त्यातुन कष्टांने कमविलेले तसेच पै पै करुन जमविलेली पुंजी चोरीस गेल्याने ग्रामस्थ आर्थिक संकटात सापडले आहेत. असे त्यांनी सांगितले. दरम्यान थंडीचा आणि रात्रीच्या अंधाराचा फायदा घेवून चोरटे शेतातील शेतमालही लंपास करीत आहे. कांदा, कपाशी तसेच इतर शेतीमालाची चोरी करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालावरही डल्ला मारीत आहेत. त्यामुळे शेतकर्यांनी घाम गाळून पिकविलेला शेतीमालावरही संक्रात येत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्यांचीही चोरी चोरटे करीत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून होत आहे. त्यामुळे पोलिस विभागाने चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा. त्यासाठी पोलिस गस्त वाढवून कसून चौकशी करावी अशी मागणी माजी आ. कुणाल पाटील यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे पत्राव्दारे केली आहे.

# अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाचे काम

## बोराडी ग्रामस्थांचा आरोप; संतप्त तरुणांनी काम पाडले बंद, ठेकेदारांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी । बोराडी



गेल्या अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर शिरपूर तालुक्यातील बोराडी-सामऱ्यापाडा व रोहिणी खंबाडे रस्त्याच्या नव्याने खडीकरण व डांबरीकरणाचे काम सुरू झाले आहे. मात्र, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे संबंधित ठेकेदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केले जात असल्याचा खळबळजनक आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामात डामराचा वापर अत्यल्प असून केवळ खडीवर डामराचा शिडकावा करून लोकांच्या डोळ्यात धूळफेक केली जात आहे. दरम्यान संतप्त स्थानिक तरूणांनी रस्त्याचे काम बंद पाडत रोलरसमोर उभे राहून निदर्शने केली.

शिरपूर तालुक्यातील गावांचा विकास करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी गावातील रस्ते शहराकडे जोडण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव पाठवून निधी मंजूर करून आणतात. पण संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षापणामुळे ठेकेदार आपल्या मनमानी कारभारामुळे रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याने दिसून येत आहे. रस्त्यावर डांबर टाकतांना नावाला डांबर टाकले जाते. यामुळे रस्त्याच्या पायात जर कच्चा असेल तर रस्ता कशाला वर्षभर तरी टिकाव घेरल का, अशा अधिकाऱ्यांच्या अडमुठ्या धोरणामुळे शासनाचे लाखो रुपये पाण्यात जात आहेत. याबाबत शासनाने अशा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. बोराडी-सामऱ्यापाडा व रोहिणी खंबाडे रस्त्याबाबत नागरिकांनी अनेक तक्रारी व तोंडी अधिकाऱ्यांना व ठेकेदारांना सांगितले. तरी देखील ठेकेदार मनमानी कारभाराने काम करीत आहे. याबाबत अधिकारी पूर्णतः दुर्लक्ष करून कामाकडे फिरकत देखील नाही. यामुळे प्रशासकीय दुर्लक्ष आणि ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे संतप्त झालेल्या स्थानिक तरुणांनी थेट रस्त्यावर उतरून सुरू असलेले काम बंद पाडले आणि रोड रोलर समोर उभे राहून आपला तीव्र निषेध नोंदवला.

### लोकप्रतिनिधींची डोळेझाक

**शिरपूर तालुक्यातील रस्त्यांचे काम सुरू असून याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील लक्ष देण्याची गरज आहे. या रस्त्यावरून अनेक लोकप्रतिनिधी ये-जा करतात, परंतू कोणीच ठेकेदारांना सुचना करीत नाही. यावरून नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत जर त्वरित कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.**

# मनपा प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात पेच

## ● नो ड्यूजचा गोंधळ, मतदार यादीचा पेच; अर्ज प्रक्रियेत संभ्रम

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील निवडणूक प्रक्रियेत प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे मोठा गोंधळ उडाला असून इच्छुक उमेदवार अक्षरशः हवालदिल झाले आहेत. नोड्यूज प्रमाणपत्रे वेळेत न मिळणे, अनुक्रमांकाचा तिढा आणि मतदार यादी जाहीर होण्याआधीच अर्ज भरण्याची सक्ती यामुळे उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. अर्ज सादर करताना मतदार यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक (सिरियल नंबर) टाकणे बंधनकारक आहे. मात्र अंतिम मतदार यादी २५ तारखेला जाहीर होणार असल्याने सध्या उपलब्ध असलेला अनुक्रमांक बदलण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत आज अर्ज भरल्यास अनुक्रमांक बदलला तर अर्ज थेट बाद होण्याची भीती उमेदवारांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मतदार यादी अंतिम जाहीर झाल्यानंतरच अर्ज प्रक्रिया सुरू करणे आवश्यक होते, अशी संतप्त प्रतिक्रिया इच्छुक उमेदवारांनी दिली.**

आज अर्ज भरण्याचा महत्त्वाचा मुहूर्त असतानाही या तांत्रिक अडचणींमुळे अनेक उमेदवार अर्ज सादर करू शकले नाहीत. दिवसभर उमेदवारांनी महापालिका व संबंधित कार्यालयांचे उंबरठे झिजवले, मात्र ठोस मार्गदर्शन किंवा स्पष्ट उत्तर कुणाकडूनही मिळाले नाही. या गोंधळावर माजी नगरसेवक अशोक लाडवंजारी यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली. 'नोड्यूज व अनुक्रमांक उपलब्ध नसताना अर्ज भरण्याचा आग्रह धरला जात आहे. उपायुक्तांनी उद्या सर्व घोळ मिटवण्याचे आश्वासन दिले असले तरी आजचा महत्त्वाचा दिवस वाया गेला, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.



### ● चिन्ह फलकाबाबत गोंधळ

मनपात चिन्ह वाटपाबाबत लावण्यात आलेल्या फलकावर केवळ अपक्षांचाच उल्लेख असल्याने राजकीय पक्षांच्या इच्छुक उमेदवारांचा गोंधळ उडाला होता. मनपा प्रशासनाच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी तातडीने हा फलक हटविला. यावरुन मनपा प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा आणखी एक कारनामा समोर आला.

### ● अर्ज बाद होण्याची भीती

**मतदार यादी जाहीर होण्याआधीच अर्ज भरण्याची दोन दिवस आधीच तारीख दिल्यामुळे उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. अर्ज सादर करताना मतदार यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक (सिरियल नंबर) टाकणे बंधनकारक आहे. मात्र अंतिम मतदार यादी २५ तारखेला जाहीर होणार असल्याने सध्या उपलब्ध असलेला अनुक्रमांक बदलण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत आज अर्ज भरल्यास अनुक्रमांक बदलला तर अर्ज थेट बाद होऊ शकतो, अशी भीती माजी नगरसेवक अशोक लाडवंजारी यांनी व्यक्त केली. त्यामुळे आज मुहूर्त असूनही आपण अर्ज भरला नाही, असे लाडवंजारी यांनी सांगितले. तसेच याबाबत आपण उपायुक्तांना भेटलो. त्यांनी सर्व घोळ उद्या २५ डिसेंबर रोजी मतदार यादी जाहीर झाल्यावर मिटलेला असेल, असे सांगितले.**

प्रशासनाने आवश्यक पूर्वतयारी न करता अर्ज प्रक्रिया सुरू केल्याने निवडणूक व्यवस्थेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वेळेत नोड्यूज प्रमाणपत्रे, अंतिम मतदार यादी व अनुक्रमांक उपलब्ध करून दिले नाहीत, तर अनेक इच्छुक उमेदवार निवडणूक रिंगणाबाहेर फेकले जाण्याची भीती व्यक्त केली जात असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# कै. बापूसाहेब आचार्य गरुड यांचा ४१ वा स्मृतिदिन उत्साहात





प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील वरखेडी येथील श्रीमती पी.डी. बडोला माध्यमिक विद्यालयात कै. बापूसाहेब आचार्य गजाननराव रघुनाथ गरुड यांचा ४१ वा स्मृतिदिन तसेच राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती, कै. आचार्य गजानन गरुड, राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज व संत हरीप्रसाद महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पी. एन. पाटील यांनी केले. त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांचे यश व कर्तृत्व हीच कै. आचार्य बापूसाहेबांना खरी मानवंदना ठरेल. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समर्पित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य संजय लक्ष्मण पाटील होते. प्रमुख उपस्थितीत स्थानिक सल्लागार समितीचे उपाध्यक्ष हाजी इस्माईल फकीरा, पाचोरा पंचायत समितीचे माजी सभापती, वरखेडीचे माजी सरपंच धनराज अण्णा विसपुते, माजी उपसरपंच डॉ.धनराज राजू पाटील, ग्रामपंचायत सदस्य विजय भोई, धनराज रघुनाथ पाटील, भोकरीचे सरपंच अफसर शकुर काकर, पत्रकार रविशंकर पांडे, हेमशंकर तिवारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे स्वागत पुष्पहाराने करण्यात आले. स्मृतिदिनानिमित्त विद्यालयात रंगमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये चित्रकला, मेहंदी, रंगभरण, टाकाऊ वस्तूपासून सजावटीच्या वस्तू तयार करणे, रांगोळी स्पर्धा तसेच भव्य चित्रप्रदर्शन घेण्यात आले. विविध स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.एस. बव्हाण यांनी केले.

## ● निधन वार्ता

### शिवराम पवार; आज अंत्ययात्रा



**जळगाव ।** शहरातील न्यू सम्राट कॉलनी येथील रहिवासी शिवराम विठ्ठल पवार (वय-८७) यांचे दि.२४ रोजी सायंकाळी ५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.२५ रोजी सकाळी ११ वाजता राहत्या घरुन निघेल. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. ते ज्ञानेश्वर शिवराम पवार यांचे वडील तर तुषार विश्वनाथ पवार यांचे आजोबा होत.

# लोहारा येथे राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या पुण्यतिथीदिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । पाचोरा

लोहारा येथे देशातील स्वच्छता अभियानाचे जनक, अज्ञान, अंधश्रध्दा आणि अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाला कीर्तनासारख्या माध्यमाने जागरूक करून समाज सुधारणा करणारे संतगाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम येथील अभ्यासिकेत मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



स्वतःच्या हाती झाडू घेवून जनमनात स्वच्छतेचा मंत्र घुमविणारे व-हाडच्या मातीतील थोर समाजसुधारक व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांनी सर्वसामान्य माणसाचे ऐहिक जीवन सुखी कसे होईल, तो अंधश्रध्देपासून मुक्त, सुशिक्षित व संपन्न कसा होईल याचेच सदैव प्रबोधन केले. थोर समाजसुधारक, कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी दिना निमित्ताने त्यांच्या कार्याला आणि पवित्र पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे मनोरुग्णांसाठी काम करणारे माणुसकी समूहाचे जळगाव जिल्हाध्यक्ष गजानन क्षीरसागर यांच्या हस्ते पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. खऱ्या भक्तीचा मार्ग दाखवणारे श्री संत गाडगेबाबा हे चालते बोलते विद्यापीठ असून त्यांनी कोणतेही औडंबर न करता एक गाडगे एक काठी काना कवळी व अंगावर चिंध्यापासून या समाजाला अंधश्रद्धेच्या खाईतून काढून खऱ्या भक्तीचा मार्ग दाखवला व माणसांमध्ये देवाला शोधण्याचा प्रयत्न करा व या पुण्यतिथी दिनानिमित्ताने आपण दीनदुबळ्यांसाठी सेवा करण्याची प्रतिज्ञा घ्यावी असा मौलिक सल्ला गजानन क्षीरसागर यांनी दिला, रमेश लिंगायत यांनी सूत्रसंचालन केले तर अरुण लिंगायत यांनी आभार मानले.

# अमळनेरात दुकाने फोडणाऱ्या अट्टल चोरट्यास अंकलेश्वर येथून अटक

प्रतिनिधी । अमळनेर

शहरातील मध्यवस्तीत बाजारपेठेत चार पाच दुकाने पत्रा कापून, शेड कापून फोडण्यात आली आणि त्यातील वस्तू चोरीस गेल्याने शहरात खळबळ माजली होती.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी तातडीने शहरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि त्यांना एक संशयित चोरी करताना आढळला. त्याचा चेहरा पाहिला असता तो प्रशांत जगन वालडे मूळ रा.गोरगावले ता. चोपडा व हल्ली मुक्काम अंकलेश्वर गुजरात असा आढळून आला. त्याने यापूर्वी देखील अनेक ठिकाणी चोऱ्या करण्यात त्याचा हातखंडा होता. पोलीस निरीक्षक निकम यांनी प्रशांत पाटील, उज्वल म्हस्के, गणेश पाटील, निलेश मोरे, नितीन मनोरे, विनोद संदानशीव या पोलिसांच्या पथकाला अंकलेश्वर येथे चोरांचा शोध घेण्यासाठी पाठवले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे प्रशांत वालडे याला ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.अमळनेर शहरासह ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात चोऱ्या होत आहे. यासाठी पोर्लिसांनी गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.

## भुसावळ पोलिस उपअधीक्षकपदी केदार बारबोले



**भुसावळ ।** येथील पोलिस उपअधीक्षकपदी नागपूर शहर सहाय्यक पोलिस आयुक्त केदार प्रकाश बारबोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बारबोले यांनी यापूर्वी २०२४ मध्ये जळगावात प्रोबेशनरी अधिकारी म्हणून काम केल्याने त्यांना जिल्ह्याची इत्यंभूत माहिती आहे. राज्य शासनाच्या गृह विभागाचे कार्यासन अधिकारी मृणाल कृष्णा सावंत यांनी बदलीबाबत आदेश जारी केले आहेत. भुसावळचे उपअधीक्षक संदीप गावित यांची बढतीवर लवकरच बदली होईल .

# रोटरी जळगावतर्फे वैद्यकीय शिबिरात ५५० रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब जळगावतर्फे धरणगाव तालुक्यातील अंजनविहिरे येथे मोफत रोगनिदान व उपचार शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात पंचक्रोशीतून सुमारे ५५० हून अधिक गोरगरीब रुग्णांची तपासणी करण्यात आली.**

याप्रसंगी रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव पंकज व्यवहारे, मेडिकल कमिटी चेअरमन डॉ. जयंत जहागिरदार व प्रकल्प को-चेअरमन राकेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात शिबीराचे नियोजन करण्यात आले होते.



शिबिरास प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. जगताप, जितेंद्र ढाके, उदय पोतदार, योगेश गांधी, संदीप शर्मा, शाम अग्रवाल, मनोज जोशी, सुबोध सराफ, कॅप्टन मोहन कुलकर्णी. किशोर तलरेजा, नित्यानंद पाटील, अरविंद हसवाणी यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या प्रास्ताविकात अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी डॉ. व्ही. आर. पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र राकेश चव्हाण यांच्या पुढाकाराने आयोजित हे शिबीर आपल्या गावाप्रतीची कृतज्ञता व्यक्त करणारे आहे. गावातील गरजूंसाठी आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी म्हणून दरवर्षी हे शिबिर आयोजित करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र संघ राष्ट्रीय मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत विजेता

## ● जळगावच्या संस्कृती मेढेंना सुवर्णपदक प्रदान

प्रतिनिधी । भुसावळ

**विफा महाराष्ट्रच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय ज्युनियर मुली फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाने चमकदार कामगिरी केली आणि अंतिम विजेते होण्याचा मान मिळवला.** भुसावळ ताप्ती शाळेतील एक आशादायक खेळाडू आणि जळगाव जिल्हा फुटबॉल संघटनेशी संबंधित संस्कृती मनोज मेढे यांनी या ऐतिहासिक विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराष्ट्र संघाच्या सदस्या म्हणून खेळताना, संस्कृती मेढे यांनी सुवर्णपदक जिंकले, ज्यामुळे केवळ जळगाव जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला राष्ट्रीय पातळीवर गौरव मिळाला.



या प्रतिष्ठित कामगिरीबद्दल, केंद्रीय राज्य क्रीडा मंत्री आणि खासदार रक्षा खडसे यांनी २३ डिसेंबर २०२५ रोजी भुसावळ येथील खासदार क्रीडा महोत्सवात संस्कृती मेढे यांचा विशेष सन्मान केला. त्याच प्रसंगी, जळगाव जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सचिव फारुख शेख यांचाही जिल्ह्यातील फुटबॉलच्या विकास, मार्गदर्शन आणि प्रचारात दिलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. समारंभात उपस्थित मान्यवरांनी संस्कृती मेढे यांच्या कठोर परिश्रम, शिस्त आणि क्रीडा वृत्तीचे कौतुक केले, तिला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि ग्रामीण आणि जिल्हा पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत तिची प्रगती तरुण खेळाडूंसाठी प्रेरणा आहे असे नमूद केले. जळगाव जिल्हा फुटबॉल असोसिएशननेही संस्कृती मेढे यांचे अभिनंदन केले.

भविष्यात ती आंतरराष्ट्रीय स्तरावर देश आणि राज्याचे प्रतिनिधित्व करेल, अशी आशा व्यक्त केली.

# पाडळसे येथे बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील पाडळसे ग्रामीण शिक्षण संस्था पाडळसे संचलित सौ. सु. कृ. पाटील उच्च माध्यमिक लोक विद्यालयज्ञष १९ डिसेंबर रोजी बाल आनंद मेळावा अतिशय उत्साहात आणि आनंदपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञान वाढावे आणि स्वकष्टाचे महत्त्व त्यांना समजावे, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आणि मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामीण शिक्षण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होतेः अध्यक्ष माननीय डॉ. उदय मधुकर चौधरी, उपाध्यक्ष आर. व्ही. पाटील, शालेय समिती चेअरमन योगराज डिगंबर बऱ्हाटे, तसेच कार्यकारी व नियामक मंडळाचे सदस्य. युवराज मधुकर पाटील, अरुण नेमचंद्र चौधरी, विनायक मधुकर पाटील, गोपाळ पिला पाटील आणि . शरद तुकाराम बऱ्हाटे, सरपंच ज्ञानेश्वर तायडे, खेमचंद कोळी, ग्रा. पं. सदस्य सुभाष भोई यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतःहून लावलेले १६ विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल होते. यासोबतच मनोरंजनासाठी खेळांचे स्टॉलही लावण्यात आले होते.



**● विद्यार्थ्यांच्या प्रचंड प्रतिसादामुळे हा मेळावा अतिशय यशस्वी ठरला. यासोबतच मनोरंजनासाठी खेळांचे स्टॉलही लावण्यात आले होते.**

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या क्रमांकाच्या स्टॉलला संस्थेचे अध्यक्ष आणि चेअरमन यांनी रोख पारितोषिक जाहीर केले. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. बी. पवार, पर्यवेक्षक आर. टी. चौधरी, सांस्कृतिक मंडळ प्रमुख संगीता इंगळे यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले.

# बोदवड तालुक्यात जमिनीच्या व्यवहारात १८.२१ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी । बोदवड

तालुक्यात जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात तब्बल १८ लाख २१ हजार ६७० रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बोडवड पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शिवाजी गोविंदा कोळे (वय ४७, व्यवसाय शेती, रा. मौजे मनूर बु., ता. बोदवड) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींनी जमिनीच्या खरेदीच्या नावाखाली फिर्यादीची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. फिर्यादीनुसार, आरोपींनी गट क्रमांक २६८/१, मौजे मनूर बु. येथील १.२७ हेक्टर जमीन विक्रीसाठी देण्याचे ठरविले होते. या व्यवहारात दरमहा तीन टक्के व्याजाने ८ लाख रुपये कर्ज घेण्यात आले. प्रत्यक्षात फिर्यादीकडून देय असलेली रक्कम १० लाख ६४ हजार रुपये इतकी असताना, आरोपींनी त्यांच्याकडून जबरदस्तीने व फसवणुकीने १८ लाख २१ हजार ६७० रुपये उकळले. इतकी रक्कम पूर्ण देऊनही संबंधित जमीन फिर्यादीच्या नावावर न करता आरोपींनी विश्वासघात केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यामुळे फिर्यादीची मोठी आर्थिक फसवणूक झाली आहे. या प्रकरणी बोदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.